जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १४.१०.२०२५**

''अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपींस अटक ''

मा.पोलीस आयुक्त, ठाणे यांनी अंमली पदार्थ विक्री संदर्भात विशेष मोहीम राबवुन कडक कारवाई करण्या संदर्भात आदेश दिले होते. त्या अनुषंगाने डॉ.श्री.पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे व श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे यांनी सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने श्री.रविंद्र दौंडकर,सहा.पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राहुल मस्के यांनी विशेष मोहिम राबविली होती.

सदर मोहीमेअंतर्गत पोहवा/६९०९ गिरीश पाटील यांना मिळालेल्या माहितीनुसार वरिष्ठांचे परवानगीने सापळा कारवाई केली असता, दिनांक ११/१०/२०२५ रोजी शिवसेना शाखेसमोर, कळवा नाका, ता.जि.ठाणे येथे इसम नामे **इरफान नुरमोहमद शेख, वय ४७ वर्षे** यांचे ताब्यातुन एकुण रू. ४०,६४,०००/- किंमतीचा, २०३.२ ग्रॅम वजनाचा ''मेफेड्रॉन (एमडी)'' हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

सदर इसमांविरूद्ध कळवा पोलीस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ७९४/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २२ (क), २९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात येवुन त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली असुन त्यांची दिनांक १५/१०/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे. नमूद गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि/ सोमनाथ कर्णवर-पाटील, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे हे करीत आहे.

तसेच पोहवा/४७०५ संदीप चव्हाण यांना मिळालेल्या माहितीनुसार वरिष्ठांचे परवानगीने सापळा कारवाई केली असता, दिनांक ०३/१०/२०२५ रोजी रूत्वीका लंच होमचे समोर, हाजी जान कंपाऊड, शिळफाटा, ठाणे याठिकाणी इसम नामे मोहमद इरफान **मोहमद हानिफ शेख, वय २५ वर्षे** याचे ताब्यातुन एकुण रू. ४,०२,०००/- किंमतीचा, २०.१ ग्रॅम वजनाचा ''मेफेड्रॉन (एमडी)'' हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

सदर इसमाविरूद्ध शिळडायघर पोलीस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ८९३/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २२ (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि/दिपक डुम्मलवाड अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे हे करीत आहे.

यातील अटक आरोपीत यांचेकडून जप्त करण्यात आलेला ''मेफेड्रॉन (एमडी)'' हा अंमली पदार्थ कोणाकडुन आणला? सदर अंमली पदार्थ कोणास विक्री करणार होते? या अनुषंगाने पुढील तपास करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राहुल मस्के, सपोनि/ निलेश मोरे, सपोनि/सोमनाथ कर्णवर-पाटील, पोउपनि/राजेंद्र निकम, पोउपनि/दिपक डुम्मलवाड, पोहवा/शिवाजी रावते, पोहवा/संदीप चव्हाण, पोहवा/हरीष तावडे, पोहवा/अभिजीत मोरे, पोहवा/ अमोल पवार, पोहवा/अमोल देसाई, पोहवा/हुसेन तडवी, पोहवा/अजय सपकाळ, पोहवा/अमित सपकाळ, पोहवा/नंदकिशोर सोनगिरे, पोहवा/गिरीष पाटील, पोशि/आबाजी चव्हाण, चापोना/अनुप राक्षे, मपोहवा/ शिल्पा कसबे, मपोशि/ कोमल लादे यांनी केली आहे.

अंमली पदार्थ विक्री, साठवणुक, वाहतुक, सेवन करणे हा अपराध असुन यामध्ये सहभागी असलेले इसमांबाबत कोणतीही माहिती उपलब्ध असल्यास अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर येथे द्यावी.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर